19-20


# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)


SHIVAJI COLLEGE HINGOLI

March 2020 Special Issue – 28, Vol. 4

## Relevance of Mahatma Gandhi in Today's World


Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Editors
*Guide*
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

Editor
Dr. Balasaheb S. Kshirsagar
Director, Gandhian Studies Centre
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
Dr. Dhale S.U.
Dept. of Political Science,
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
Dr. Hurgule N.R.
Dept. of Sociology,
Shivaji College, Hingoli (MS)



T.C.
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)




Scanned with OKEN Scanner

# CURRENT GLOBAL REVIEWER

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

Impact Factor – 7.139 ISSN – 2319-86948
Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

# Relevance of Mahatma Gandhi in Today's World

**March 2020 Special Issue – 28, Vol. 4**

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editors**
*Guide*
**Dr. B. G. Gaikwad**
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

*Editor*
**Dr. Balasaheb S. Kshirsagar**
Director , Gandhian Studyies Center
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Dhale S.U.**
Dept. of Political Science,
Shivaji College, Hingoli (MS)

*Co-Editor*
**Dr. Hurgule N.R.**
Dept. of Sociology,
Shivaji College, Hingoli (MS)

T. C.
Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)

**Shaurya Publication, Latur**



Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -28 , Vol. 4 | March 2020 | Peer Reviewerd

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# CURRENT GLOBAL REVIEWER

Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 28, Vol. 4**
Title of the issue :

## Relevance of Mahatma Gandhi in Today's World

## SHAURYA PUBLICATION

© All rights reserved with the authors & publisher Price :

**PRINTED BY**
Shaurya Offset
Old MIDC , kalamb Road, Latur

EDITION :
**March 2020**

PRICE : 350 /-

या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन व पुनप्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

14. म.गांधीचे ग्राम विकासासंबंधी विचार : विशेष संदर्भ ग्राम स्वराज्य व ग्रामोद्योग 37
प्रा.राम गणपतराव शेवलीकर

15. महात्मा गांधी आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ 39
प्रा.डॉ. संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी

16. म.गांधी आणि अराज्यवाद 42
प्रा.वाघमारे के.एच.

17. महात्मा गांधींना अभिप्रेत अर्थनीती 47
प्रा.डॉ.जितेंद्र पांडुरंगराव काळे

18. महात्मा गांधी यांचे राष्ट्रभाषे विषयी विचार व कार्य 49
डॉ.श्रीकृष्ण काकडे

19. गांधीजीचे अहिंसेविषयक विचार 51
प्रा.डॉ.बालाजी खराबे

20. बाल तत्त्वचिंतक : महात्मा गांधी 54
प्रा. डॉ भुसारे एस. आर.

21. ग्रामीण विकासात म. गांधी विचारांची प्रासंगिकता 58
प्रा. डॉ. विलास कऱ्हाळे

22. गांधीजी आणि ग्राम विकास कल्पना 59
प्रा. सौ. गीता विशे

23. महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास 63
शैलेश रेवा पवार

24. राष्ट्रपिता महात्मा गांधींचा ग्रामीण विकासाचा दृष्टिकोन 65
दिलीप दामु कुमरे

25. विसाव्या शतकात गांधी विचारांची प्रासंगिकता 69
प्रा. संगिता बी. चव्हाणके

26. "महात्मा गांधी यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान" 72
प्रा. विनायक नथुराम तंत्रे

27. महात्मा गांधीच्या विचारांचे मराठी साहित्यातील स्वरूप व भुमिका यांचा आढावा 75
प्रा.सिध्दार्थ कुंडलिक इंगोले

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 28 , Vol. 4 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# बाल तत्त्वचिंतक : महात्मा गांधी

प्रा. डॉ भुसारे एस. आर.
तत्त्वज्ञान विभाग, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

गोषवारा :-

संशोधन करत असतांना विषय निवडी नंतर त्या विषयासंबंधी आपण कोणत्या प्रकारचा दृष्टिकोन मांडणार आहोत ठरवणे आणि तो त्यात उतरवणे महत्त्वाचे असते. प्रस्तुत शोधन निबंध हा महात्मा गांधी यांच्या बालवयातील घडले प्रसंगाच्या माध्यमातून त्यांच्या मनावर कोणत्या प्रकारचा परिणाम झाला, तसेच त्या माध्यमातून ते कसे बाल तत्त्वचिंतक ठ हे सिध्द करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भावनिक अंगाणे जेव्हा आपण त्या प्रसंगाकडे बघतो तेव्हा असे लक्षात येते की असले साधे सरळ प्रसंग हे प्रत्येकांच्या जीवनात घडतात. परंतू महात्मा गांधी यांना प्रसंगामुळे महात्मा बनण्यास मदत झा 'महात्मा' कोणीही होऊ शकत नाही.

संज्ञा :-

महात्मा गांधी यांच्या जीवनासंबंधी आजपर्यंत असंख्य असे शोध प्रबंध आणि दृष्टिकोन आपल्याला पहावयास मिळतात पण त्यांच्या बालवयातील त्यांच्या कडून केल्या गेलेल्या कृती आणि प्रसंग यांचा त्यांच्या बालमनावर कसा परिणाम झा त्यांनी बालपणापासून आपल्या कडून झालेल्या चुकांचे प्रायश्चित घेतले. आणि त्यापासून नैतिकतेचे धडे ही घेतले हे या शोध निबंधातून दाखवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रस्तावना :-

तसे पाहिले तर तत्त्वज्ञान हा थोरांमोठयांचा प्रांत आहे. कारण तत्त्वज्ञानासांबंधी बोलतांना किंवा चर्चा करतांना सह आपण एक दोन छोटया मुलांना कधीच पाहत नाही. तत्त्वज्ञानाच्या विषयी बोलण्यासाठी किंवा आपले विचार व्यक्त करण्यासाठी त्या वक्त्यांच्या ठिकाणी तेवढी प्रगल्भता, चिकित्सक बुध्दी, समंजसपणा हवा असतो. जो लहान मुलांमध्ये अजून आलेला नसतो. त्यामुळे तत्त्वचिंतन तर सोडाच पण व्यवस्थितपणे आपले म्हणणेही लहान मुलांना मांडता येत नाही. म्हणून आज जो विषय निवडला आहे तो वाचल्यानंतर त्या विषयी शंका येण्याची शक्यता आहे. पण आपण जेव्हा मोहनदास करमचंद गांधी यांचे आत्मचरित्र वाचतो तेव्हा आपल्याला तो अनुभव आल्याखेरीज रहात नाही. आपण ज्या वयात खेळ खेळणे अपेक्षित असते. त्या छोटया वयातही महात्मा गांधींनी आपल्या जीवनातील आलेल्या (घेतलेल्या) अनुभवांचे सत्य कथन करुन एक तत्त्वचिंतक कसा आपल्या समोर उभा केला आहे. हे पहायला मिळते.

उद्देश :-

प्रस्तुत शोध निबंधाचा मुख्य उद्देश हा आहे की, महात्मा गांधी बालवयापासून कसे तत्त्वनिष्ठ आणि नितीमुल्यांचा जोपासना करणारे होते. हे सिध्द करुन दाखवणे हा आहे.

विषय विश्लेषण :-

महात्मा गांधी यांच्या चरित्राचे वाचन करतांना ज्या लहानपणीच्या छोटया-छोटया घटना आहेत. त्या पाहिल्यानंतर असे लक्षात येते की, त्या घटना जरी लहानपणीच्या छोटया-छोटया घटना असल्या तरी त्या संदर्भातील महात्मा गांधी यां विचार आणि त्यांच्या छोटयाश मनावर त्याचा झालेला परिणाम, त्या अनुषंगाने त्यांच्याकडून घडलेले वर्तन ह्या गोष्टींचा अभ्यास करणे खरोखर आजच्या काळाची गरज आहे. असे मला वाटते कारण त्या घटनांचे अतिशय मुलगामी परिणाम महात्मा गांधी यांच्या मनावर झालेले दिसतात. नव्हे त्या घटनामुळेच छोटे गांधी कसे महात्मा घडत गेले हे लक्षात येते. म्हणून महात्मा गांधी यांचे आत्मचरित्र त्यांचे बालपण आजच्या घडणाऱ्या मुलांनी आवर्जून वाचावे. त्यांची आजची प्रासंगिकता मला महत्त्वाची वाटते. आज मोबाईलच्या आहारी गेलेली मुले आणि तेव्हा लहानपणी महात्मा गांधी यांनी केलेल्या चुका पाहिल्या नंतर आजची मुलेही या चुका शिका पध्दतीनुसार पुढे मोठे काही तरी करु शकतील असा आशावाद या माध्यमातून व्यक्त करावासा वाटतो.

महात्मा गांधी यांच्या आत्मकथेतून खूप काही शिकण्यासारखे आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे ते तर आपल्यासारखेच वागले, वाढले ही आपलेपणाची भावना त्या माध्यमातून निर्माण होते. ही आपलेपणाची भावना महत्त्वाची आहे असे मला

T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli(MS.)



Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

त्यांनी आयुष्यभर सांभाळल्या. व्यायामा ऐवजी फिरण्यामुळे काय फायदे होतात. त्यांचे आदर्श उदाहरण म्हणजे महात्मा गांधी हे होत. त्यांनी समस्त जगासमोर हा आदर्श घालून दिला आहे.

मैत्रीच्या संदर्भातला लहानपणीचा एक प्रसंग त्यांनी सांगितला की, मित्र चांगला असेल तर त्यांच्याकडून चांगले गुण आपण घेत नाहीत. पण त्यांच्याकडचे वाईट गुण आपण लवकर शिकूण घेतो. हा प्रसंग सांगतांना ज्या गांधीजींनी पुढे आयुष्यभर अहिंसा तत्त्व अत्यंत कठोरपणे स्वीकारले. पण त्याच गांधींनी लहानपणी एका वाईट मित्राच्या सांगण्यावरुन मांसाहार घेतला त्यांनी सत्य नोंदवले आहे. त्यांच्या मते वाईट मैत्रीचा वाईट परिणाम आपल्या आयुष्यावर होतो. कारण वाईट गुण माणूस लगे स्वीकारतो. चांगले गुण तेवढया लवकर स्वीकारत नाही. ते म्हणतात, "माझे असे मत आहे खाजगी दोस्ती अनिष्ट आहे. कार मनुष्य दोषच लवकर उचलतो. गुण ग्रहण करण्यास प्रयास पडत असतात. ज्याला आत्म्याची-ईश्वराची-मैत्री संपादावयाची आहे त्याने एकटे राहावे हे चांगले, किंवा अखिल जगताची मैत्री करावी. वरील विचार योग्य असोत किंवा अयोग्य असोत, माझा त निकट मैत्री जमविण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला."[2]

त्यांच्या मते दुष्टप्रवृत्तीच्या व्यक्तीच्या संगतीमुळे सज्जन व्यक्तीही दुष्ट बनू लागते. त्यांच्या आयुष्यात बालपणी या गोष्टी घडल्या. त्या त्यांनी नम्रपणे मान्य केल्या हा त्यांचा थोरपणा मला भावतो. एका तत्त्ववेत्याला साजेसा वाटतो. म्हणून महात्मा गांधी हे इतर तत्त्वचिंतकापेक्षा वेगळे आणि बालपणापासून आपल्या कृत्यावर नियंत्रण आणि समिक्षा करणारे कर्ते सुधारक हो असे मला वाटते. एक चोरी लपविण्यासाठी त्यांना किती खोटे बोलावे लागले. हे ही त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. त्यांचा स्पष्टवक्तेपणा मला भावतो. म्हणून महात्मा गांधी महान होते. तत्त्ववेत्ते होते असे मला वाटते. ही सत्यता स्वीकारुन इतरांसमोर मांडण्याचे जे धैर्य लागते. ते त्यांच्यात होत आणि ते त्यांच्यात स्वचिंतन आणि स्वसमिक्षेमुळे आले असे मला वाटते.

वाईट संगतीमुळे मुले वाईट वळणाला लागतील ही धास्ती आई-वडिलांना असते. ती तेव्हाही होती. आणि आजः मोठया प्रमाणावर आहे. पण मुले वाईट वळणाला लागण्यासाठी किंवा शुन्यातून बाहेर पडण्यासाठी त्यांच्यावर घरातून झाले संस्कार किती प्रमाणावर काम करतात. हे त्यांच्यावर अवलंबून असते. महात्मा गांधी हे सुसंस्कारी कुटुंबातील सुसंस्कृत मुल होते. पण प्रामाणिकपणे मान्य केले. याचा अर्थ त्यांच्यावर लहानपणापासून कुटुंबाकडून झालेले संस्कार दर्जेदार होते. त्यां त्यांची चुक खूप लवकर लक्षात आली. कारण ते विचारी होते. मुळात ते सद्वर्तनी होते. चांगल्या-वाईटाची जाण त्यां लहानपणी चांगल्या प्रकारे होती. म्हणून ते त्या प्रसंगातून लवकर सावरु शकले. पण मित्राच्या सहवासात आल्यानंतर त्यां मांसाहाराच्या संदर्भात किती चुकीचे आणि वाईट वर्तन केले. हे त्यांनी स्पष्ट आणि प्रामाणिकपणे मान्य केले. कारण मित्रा मित्रता ही अनिष्ट आहे. हे त्यांच्या लवकरच लक्षात आले आणि त्या प्रसंगातून सावरतात न सावरतात तोच त्यांनी वर्णन केले बालपणीचा प्रसंग किंवा व्यसन आहे. जे त्यांना लागले होते. ते म्हणजे बिडया पिण्याची सवय किंवा व्यसन होय. बि पिण्याच्या व्यसनामुळे तर त्यांना आत्महत्येचे विचारही आले. त्यांनी तसा प्रयत्नही केला. चोरी करण्याचा प्रयत्न केल कर्जबाजारी बनले. हे सर्व प्रकार त्याच्या वयाच्या साधारण 08-09 ते 17-18 या कालावधीत घडले. त्यांनी केलेली चोरी म्हण सोन्याचे कडे कापून विकले. ही चोरीही त्यांनी वडिलासमोर प्रामाणिकपणे मान्य केली. माणूस कितीही मोठा असला त नासमंजसपणामुळे किंवा कोणाच्या बहकाव्यात येवून त्यांच्याकडून अनेक लहान-मोठया चुका होतात किंवा होवू शकतता. प त्या चुकांची निर्मळ मनाने किंवा निर्भिडपणाने कबुली देणे हे प्रत्येकालाच शक्य होईल असे सांगता येत नाही. नव्हे देताच र नाही. त्यासाठी लागेल तो मनाचा निडरपणा निर्भेळपणा आणि स्पष्टवक्तावृत्ती महत्त्वाचे म्हणजे तत्त्वनिष्ठवृत्ती. जी महात गांधी यांच्याकडे होती. ज्यामुळे महात्मा गांधी महात्मा बनू शकले. त्यांची बालपणापासूनची तत्त्वनिष्ठा पाहिल्यानंतर आप अचंबित होतो. एवढया लहान वयात अगदी छोटया छोटया प्रसंगाच्या माध्यमातून त्यांना तत्त्वनिष्ठतेची जाण झाली. वा गोष्टी आपण केल्या नाही पाहिजे हे त्यांच्या त्यावेळी लक्षात आलं. आणि त्यासाठी प्रायश्चित घेण्यासाठीही ते अनेक वेळा तय झाले होते. त्यावेळी त्यांनी प्रामाणिकपणे स्वत:ला शिक्षेस पात्र समजले. या गोष्टींचा विचार करता एक गोष्ट लक्षात येते क किती मोठी प्रगल्भता होती महात्मा गांधी यांच्या ठिकाणी.

सहज विचार केला तर एक गोष्ट लक्षात येते की, पहिल्या ते चौथ्या वर्गातील विदयार्थ्याचे वय ते काय असते ? सहज स्वत:ला सांभाळणे, आपल्या वस्तूंची काळजी घेणे, त्याच बरोबर आपल्या वडिलांच्या तब्येतीची काळजी घेणे, आईच्या संबं विचार करुन ममत्वाची भावना निर्माण होणे या गोष्टी जाणत्या मुलांकडून घडणेही क्वचित अपेक्षिले जाईल. पण महात गांधीनी हे अगदी बाल वयात केले. हे नक्कीच गौरवास्पद आहे. विलयतेला शिक्षणासाठी जातांना आणि तेथील वास्तव्यात

Lecturer
Shivaji College Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS)



Scanned with OKEN Scanner

SHIVAJI COLLEGE HINGOLI

वाटते. कारण आपण सामान्यपणे महात्मा गांधींना महात्मा या मोजपट्टीवरच मोजतो आणि ते तिथ बरोबर बसतात. महात्मा गांधीही सर्वसामान्यासारखे जगले, वाढले हे थोडे अचंबित करणारे आणि न कळतपणे आपलेपणा निर्माण करणारे आहे असे मला वाटते. इतर थोर व्यक्तींची चरित्रे वाचल्यानंतर त्या माध्यमातून आपल्याला अनेक धडे मिळतात. पण महात्मा गांधीचे चरित्र वाचल्यानंतर त्यांच्या बालपणातील आयुष्यातून आपल्याला एक तत्त्वचिंतक साक्षात आपल्या डोळयासमोर उभा राहतो. हा मोठा फरक आपल्याला वरील दोन्ही आत्मचरित्र वाचल्यानंतर लक्षात येतो असे मला वाटते. म्हणून मी हा विषय अभ्यासण्यासाठी निवडला आहे.

महात्मा गांधींच्या एकूण जीवनाचा विचार करत असतांना एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, महात्मा गांधी यांच्या जीवनाला तत्त्वज्ञानात्मक बैठक दिसते ती इतरांच्या ठिकाणी दिसत नाही. हे महात्मा गांधी यांचे वेगळेपण आहे. अगदी बारकाईने जेव्हा आपण महात्मा गांधी यांच्या बालपणाचा विचार करतो. तेव्हा अत्यंत अचंबित करणारे त्यांचे बालपणीचे अनुभव आपल्या डोळयासमोर तरळत राहतात. तसे पाहिले तर महात्मा गांधी हे लहानपणापासून अत्यंत सर्वसामान्य विद्यार्थी राहिले असे त्यांनी अनेकदा नमुद केले आहे. "बालपण पोरबंदरातच गेले कोठल्याशा अशा शाळेत मला घातले होते असे आठवते. कसेबसे काही पाढे शिकलो. त्यावेळी मुलांबरोबर पंतोजींना मात्र शिव्या देण्यास शिकलो होतो. ऐवढी आठवण आहे. दुसरे काही एक आठवत नाही. त्यावरुन मी अनुमान करतो, की माझी बुध्दी मंद असावी."[1] सर्वसामान्य विद्यार्थी म्हणून जरी शाळेत असले तरी त्यांच्या वैयक्तिक जीवनात ते लहानपणापासून खूप अज्ञाधारक, सत्य प्रिय, पितृ भक्त, कार्यदक्ष, अन्यायाविरुध्द लढणारे होते हे त्यांच्या आत्मकथेतील अनेक प्रसंगावरुन जाणवते. तेव्हापासून त्यांच्या जीवन जगण्याचा संबंध त्यांनी तत्त्विकतेशी कशा पध्दतीने लावला आहे. हे या शोधन निबंधामध्ये सिध्द करावयाचे आहे. महात्मा गांधी यांची महानता त्यांच्या जीवनभर केलेल्या कार्यावरुन तर आहे. पण त्यांच्या लहाणपणी जे जे प्रसंग घडले त्यांचा त्यांच्या बालमनावर जो सकारात्मक परिणाम झाला, त्या प्रसंगातून त्यांच्या मनाची तात्त्विक बैठक, जडण-घडण झाली. त्यांचा परिणाम म्हणजे मोठे पणीचे महात्मा गांधी घडले असावेत. एवढे परिणामकारक प्रसंग होते असे मला वाटते.

महात्मा गांधी हे लहानपणी अत्यंत बुजऱ्या आणि भिड्स्त स्वभावाचे होते. ते शाळेतही तसेच असत. वर्गातील कोणत्याही विदयार्थ्याला बोलत नसत की, कोणाच्या सोबत राहत नसत. शाळा ते घर आणि घर ते शाळा असा त्यांच्या प्रवास असे. "माझी थटा केली तर" अशी त्यांना सारखी भिती वाटत असे. विनयशील वृत्ती असल्यामुळे त्यांनी मोठयांचा अनादर करणे, दोष काढणे या गोष्टी कधीच केल्या नाहीत. अशा विनयशील असलेल्या बाल मनावर अधिक चांगले संस्कार होण्यासाठी लहानपणीच आणखी दोन प्रसंग घडल्याचे ते सांगतात, की ज्यामुळे त्यांची पितृभक्ती आणि सत्यप्रियता हे गुण अधिक परिणामकारकपणे वृध्दींगत झाले. ते प्रसंग म्हणजे त्यांच्या वडिलांनी विकत आणलेले 'श्रावण-पितृभक्ती' हे नाटक त्यांच्या वाचनात आले. आणि तसेच त्याच सुमारास त्यांनी ते नाटक चित्ररुपात काचेतून चित्र दाखविणाऱ्याकडे प्रत्यक्ष पाहिले आणि त्यांनाही असे वाटले की, "मला पण श्रावणासारखे व्हावयाचे".

दुसरा प्रसंग म्हणजे गावात येणाऱ्या नाटक मंडळीचे नाटक त्यांनी पाहिले. ते होते "हरिशचंद्र आख्यान" हे नाटक त्यांनी पाहिले आणि सत्यप्रियता हा गुण अगदी बालवयापासून वृध्दींगत झाला. ते म्हणता मला हे नाटक खूप आवडले. किती वेळा पाहिले तरी माझे मन भरत नव्हते. मग मनातल्या मनात मी ते अनेक वेळा पाहिले. तेव्हा त्या बालमनाला असे वाटले की "सर्वांनीच हरिशचंद्रासारखे सत्यवादी का होऊ नये ?" ते म्हणतात की श्रावण किंवा हरिशचंद्र हया कोणी ऐतिहासिक व्यक्ती असोत वा नसोत पण प्रत्येकाने आपल्या मनामध्ये ती पात्रे जीवंत ठेवली पाहिजे. जेणे करुन समाज सुसंस्कृतीत होऊ शकेल. हे त्यांच्या तात्त्विक विचारांचे तेव्हा पासूनचे तत्त्व मला भावले. त्यांची तत्त्वाला धरुन राहण्याची वृत्ती सहज लक्षात येण्यासारखी आहे. सत्यागृही म्हणजेच सत्याचा आग्रह धरणारे महात्मा गांधी हे अचानक वयाच्या 40-42 व्यावर्षी बनले नव्हते. सेवाभाव आणि सत्याचे पुजारी हे दोन तत्त्व त्यांनी अगदी लहानपणीच जोपासले होते. हे अभ्यासांती लक्षात येते.

हायस्कुलमध्ये गेल्यानंतर त्यांच्या अभ्यासाला गती मिळाली. पण त्याचे त्यांना सुखही नाही की दुःखही नाही. दोराबजी गुरुजी वरच्या वर्गातील मुलांना खेळ शिकवित असत. महात्मा गांधींना लहानपणापासून कोणतेच खेळ खेळण्यात स्वारस्य नव्हते. पण त्यांना कधी त्यांचे दुःखही झाले नाही. कारण त्यांनी लहानपणापासून व्यायाम केला नाही. किंवा खेळ खेळले नाही तरीही त्यांनी चालणे म्हणजेच पायी चालणे कधीच म्हणजे जीवनभर सोडले नाही. आणि त्या चांगल्या सवयी

...ure
College Hingoli
Dist.Hingoli (M.S.)

अनेक प्रसंग असे आले की, त्यांचे एक पत्नीवृत्ताचा भंग होईल. अगदी विसीतल्या त्या कोवळय वयातही त्यांनी आपल्या या वृत्ताचा भंग होवू दिला नाही. जे वय अगदी हुलडबाज असते. त्या वयात एखादया मुलाने पन्नासीतल्या एखादया प्रौढालाही लाजवेल असा संयमीपणा दाखविला. हे त्यांच्या महानतेची बिजेच म्हणावी लागतील. ज्या वयांत अनेक गोष्टी मनाला भुरळ घालणाऱ्या असतात. त्या वयात त्यांचा हा संय्यम अलौकिकच वाटतो. हे कार्य किंवा अशा प्रकारचे नितांत सुंदर वृत्ती एखादी अविचल आणि तत्त्वनिष्ठ व्यक्तीच दाखवू शकते. म्हणून महात्मा गांधी हे महात्मा होऊ शकले असे ठामपणे म्हणता येते.

एखादी भक्कम इमारत तयार करतांना जसा त्या इमारतीचा पायाही तेवढाच भक्कम लगतो. त्याचप्रमाणे एखादयाला जगात अढळ स्थान निर्माण करण्याकरिता बालवयापासून तत्त्वनिष्ठा जाणून घेवून आचरणात आणावी लागते. याचे महात्मा गांधी हे जगाच्या इतिहासातील एकमेव उदाहरण ठरतात. महात्मा गांधींची महानता अनेकांनी शब्दबध्द केली आहे. महात्मा गांधी यांना महामानव असे द.न. गोखले यांनी संबोधले आहे. ते म्हणतात, "महामानव म्हणजे मोठा मनुष्य. लाखात उठून दिसेल असा मनुष्य, असामान्य, अ-साधारण, अनन्य ! महामानव अ-सामान्य असेल ; पण तो सामान्य माणसापेक्षा नीतिदृष्ट्या खूप उंच हवा. मानव दानव न होता देव होऊ लागला की महा-मानव होतो. गुणांनी उंच होता होता जो भुतल सोडतो नि आकाशाला भिडतो त्याला महामानव म्हणतात."[3] महात्मा गांधी यांना आदरांजली वाहतांना विसाव्या शतकातील बुध्दीमतांचा बादशहा म्हणजे आईन्स्टाईन यांनी पुढील विचार व्यक्त केले आहेत. Gandhi, The greatest Political genius of our time, indicated the path of be taken. He gave proof of what sacrifice mam is capable of, once he has discoreded the right path. "Gandhi's development resulted form extraordinary intellectual and moral forces in combination with political ingenuity and unique situation"[4] या महान व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात अनेकांनी आपले विचार व्यक्त करत. त्यांची उत्तुंगता व्यक्त केली आहे. त्यांची तत्त्वनिष्ठा व्यक्त केली आहे. असे व्यक्तिमत्त्व कालातीत आहे असे म्हणावे लागते.

निष्कर्ष :-

1) महात्मा गांधी हे बालपणापासून तत्त्वनिष्ठ होते हे सिध्द करणे.
2) महात्मा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू उलगडून दाखविणे.
3) महात्मा गांधी यांची जीवननिष्ठा सिध्द करणे.

SHIVAJI COLLEGE HINGOLI

संदर्भ :-

1) "सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा", मो.क. गांधी, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद, पृ. क्र. 05.
2) तत्रैव, पृ. क्र. 18.
3) "गांधीजी मानव नि महामानव", लेखक द.न. गोखले, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पृ. क्र. 01.
4) "गांधीजी मानव नि महामानव", द.न. गोखले, मौज प्रकाशन गृह, मुंबई, पृ. क्र. 02

T.C

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



Scanned with OKEN Scanner